# शासन पत्र क्र. संकीर्ण- २०१५/प्र.क्र.०१/जल-१ दि. २८ एप्रिल,२०१५

## परिशिष्ट – अ

राज्यात सतत उद्भवणारी टंचाई सदृश्य परिस्थिती विचारात घेऊन "सर्वांसाठी पाणी-टंचाई मुक्त महाराष्ट्र २०१९" करण्यासाठी व टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी एकात्मिक पद्धतीने नियोजनबद्धरित्या कृती आराखडा तयार करुन पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी"जलयुक्त शिवार अभियान" महाराष्ट्र शासनाकडुन राबविण्यात येत आहे.

जलसंधारण विभागाच्या शासन निर्णय क्र. जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७ दि.०५ डिसेंबर,२०१४ मधील मुद्दा क्र. २२.अभियानाची फलनिष्पत्ती यामध्ये GPS Monitoring बाबत नमुद करण्यात आले आहे.

**जलयुक्त शिवार अभियान मध्ये मोबाईल खरेदीची तरतूद नाही. त्यामुळे जलयुक्त शिवार अभियानाची अंमलबजावणी करत असलेल्या यंत्रणेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मोबाईल चा वापर करण्यात यावा. सर्व जिल्ह्यांनी तालुका निहाय ज्या अधिकारी व कर्मचारी यांना मोबाईल व प्रशिक्षण द्यावयाचे आहे त्यांची प्राधिकृत यादी खालील मार्गदर्शक सूचनातील क्र. ई मध्ये नमूद केल्याप्रमाणे तयार करुन ठेवावी.**

### जलयुक्त शिवार मोबाईल ॲप्लिकेशन मार्गदर्शक सूचना

जलसंधारण विभागाच्या दि.०५ डिसेंबर,२०१४ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. २२.अभियानाची फलनिष्पत्ती यामध्ये GPS (Global Positioning System) Monitoring बाबत नमुद करण्यात आले आहे. त्याद्वारे प्रत्येक कामाचे आक्षांश व रेखांश प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी घेणेत येवून त्याअनुषंगाने जलयुक्त शिवार अभियानांतर्गत हाती घेण्यात आलेल्या कामांची भौगालिक माहिती व फोटो प्रणालीद्वारे नोंद घेण्यासाठी MRSAC (Maharashtra Remote Sensing Application Centre) या संस्थेच्या माध्यमातून Mobile Application विकसित करण्यात आले असुन प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर याच्या वापराबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

**नोटः-**

१) जलयुक्त मोबाईल ॲप्लिकेशन वापरण्यासाठी "GPS, GPRS व Android ४.१+Operating system" व ५ मेगापिक्सल कॅमेरा असलेल्या मोबाईलची आवश्यकता आहे. तसेच इंटरनेट डाटा कार्ड ( Internet Connectivity ) असणे आवश्यक आहे.

२) “Jalyukta.apk” फाईल **http://mrsac.maharashtra.gov.in/jalyukt** या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन Install करावी. जर आधीच हा ॲप्लीकेशन Install असल्यास त्याला uninstall करुनच नवीन ॲल्पिकेशन Install करा.

३) जलयुक्त मोबाईल ॲप्लीकेशन Install झाल्यावर आपल्या मोबाईल स्क्रिन वर Jalyukta असा Icon (चिन्ह) दिसेल.

४) Mobile app सुरु करण्याअगोदर Mobile मधील “GPS Location” सुरु करावे.

५) Jalyukta मोबाईल ॲप्लिकेशनच्या चिन्हावर क्लिक करा. Jalyukta मोबाईल ॲप्लिकेशच्या चिन्हावर क्लिक केल्यानंतर (Application सुरु झाल्यावर) त्यामध्ये खालील Menu आहेत.

A) प्रोफाईल मॅनेजर (Profile Manager)
B) मॅप ॲक्टिव्हिटि (Map Activity)
C) सेंड मॅनेजर (Send Manager)
D) व्ह्यू अँड डिलिट (View & Delete)
E) हेल्प (Help)
F) एक्झिट (Exit). (D,E व F अद्याप विकसित होत आहेत)

वरील प्रत्येक मेनू मध्ये पुढीलप्रमाणे माहिती भरावी.

**अ) प्रोफाईल मॅनेजर (Profile Manager) :**

Profile Manager या मेनूवर Click करावे, त्यानंतर Load Data for Selection वर Click करावे.त्यानंतर Select Work Area मध्ये जाऊन जिल्हा,तालुका या Option वर क्लिक करुन त्या यादीतील लागू असलेली बाब(Drop Down) पर्यायामधून निवडावी. व त्यानंतर “Download” वर क्लिक करावे,निवडलेल्या जिल्हयाची फाईल सर्वर वरुन डाऊनलोड होऊन मोबाईलमध्ये जमा होईल.व “Download District Files” मधल्या Box मध्ये दिसेल.e.g. Nagpur.txt. निवडलेल्या जिल्ह्याची फाईल आधीच डाऊनलोड झाली असल्यास "File already exists. Do you want to reload ? YES / NO " असे विचारण्यात येईल. "YES" वर click करावे जेणेकरून सर्वरवरची अद्यावत (latest) फाईल डाऊनलोड होऊन मोबाईल मध्ये जमा (download) होईल. ही कृती पुर्ण झाल्यानंतर Personal Profile Details मध्ये जावून आपले नाव टाईप करावे, कार्यालय, पदनाम (Drop Down) पर्यायामधून निवडावे, मोबाईल क्रमांक, दूरध्वनी क्रमांक व इमेलची नोंद करावी, ही माहिती भरल्यानंतर SAVE बटनवर क्लिक करुन आपली माहिती मोबाईल मध्ये जतन करा.त्याचप्रमाणे फोटो घेण्यासाठी स्क्रीन रिझोल्यूशन Image Size किमान ६४० X ४८० व Preview Size किमान ९६० X ७२० सेट करा व SAVE बटनवर क्लिक करुन आपली माहिती मोबाईल मध्ये जतन करा.

**ब) मॅप ॲक्टीव्हिटी (Map Activity) :**

Map Activity या मेन्युवर क्लिक केल्यानंतर Asset Mapping Module हा Format येईल या Format मधील Asset Attributes मध्ये जावून गावाचे नाव व कामाचा संकेतांक (Work id) निवडावा, हे केल्यावर कामाचे नाव व इतर माहिती दिसून येईल ही माहिती Drop Down मधून निवडण्यात यावी (Select करावी ). एकाच नावाचे दोन काम असतील तर कामाचा संवर्ग, भौतिक उद्दिष्ट, मंजूरी किंमत, निधी स्त्रोत इत्यदी पाहून संकेतांक निवडावा. **कामाच्या ठिकाणाची खात्री झाल्यावर GPS Position वर क्लिक करावे.**

अक्षांश/ रेखांशाची नोंद घेण्यासाठी “ GET POSITION(GPS)” या बटणवर क्लिक करावे. अक्षांश/ रेखांश येण्यासाठी आपल्या मोबाईल मधील Location फिचर सुरु असावे लागते. ते सुरु नसल्यास प्रथम ते सुरु करा व अक्षांश/ रेखांशाची अचूकता वाढविण्यासाठी Accuracy शक्यतो ६ मी. किंवा त्यापेक्षा कमी असायला हवी. त्याकरीता एकाच स्थळावर ४ ते ५ मिनीटे उभे रहा Get Position बटन वारंवार क्लिक करा व अचूकता (Accuracy) ६ मी. पेक्षा कमी आली की स्थळाचा फोटो काढावा. फोटो काढताना स्थळापासून ५ ते ६ मी. अंतरावर दूर उभे रहावे. फोटो काढताना मोबाईलची position खालीलप्रमाणे असावी :




(विशेष सुचना:- फोटो bearing angle reading सतत बदलत असते, त्याच्याकडे लक्ष्य देऊ नये.)



फोटो angle reading

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत हाती घेण्यात आलेल्या कामांचे साधारण: ३ फोटो काढावेत. पहिला फोटो काम सुरु करण्यापूर्वी (P1), दुसरा फोटो काम प्रगतीपथावर असताना (P2) व तिसरा फोटो काम पूर्ण झाल्यावर (P3) कामाच्या सद्यस्थितीनुसार (Drop Down मधून) Select करावे व फोटो काढावे. पहिला फोटो काढताना जमिनीवर खुण करुन ठेवावी, जेणेकरुन दुसरा व तिसरा फोटो काढताना त्याच स्थानावरुन काढणे सुलभ होईल.

फोटो काढल्यानंतर Remark या Option वर जाऊन काही अभिप्राय असतील तर त्याची नोंद करावी व त्यानंतर माहिती सर्व्हर वर पाठविण्यासाठी SEND बटन वर क्लिक करावे. इंटरनेट कनेक्शन योग्य असल्यास स्थळाची माहिती सर्व्हर पाठविली जाते अन्यथा इंटरनेट कनेक्शन आल्यावर पाठविण्यासाठी SEND LATER च्या वापराने माहिती पाठवा. **(प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी फोटो काढताना इंटरनेट कनेक्शन वा मोबाईल कवरेज नसेल तरी फोटो काढता येईल व GPS Location प्राप्त होईल तसेच मोबाईल कवरेज व इंटरनेट कनेक्शन उपलब्ध झाल्यावर माहिती व फोटो अपलोड करता येईल )**

**क) सेंड मॅनेजर (Send Manager):**

सेंड मॅनेजर या मेन्यू मध्ये गेल्यानंतर ज्या स्थळांची माहिती मोबाईल मध्ये इंटरनेट कनेक्शन अपूरे असल्यास सर्व्हर वर पाठविण्यासाठी सेंड मॅनेजर (Send Manager) मेन्यू चा वापर करा. यामध्ये प्रत्येक स्थळाची, फाईलची निवड करुन सेंड (Send) या बटनवर Click करावे.

ड) Mobile Application द्वारे Upload केलेले GPS Tagged फोटो व माहिती URL- http://mrsac.maharashtra.gov.in/jalyukt व http://117.240.186.22:6080/jalyukt वर पाहता येईल.

**इ) सदरहु Mobile Application वापरण्यासाठी अधिकारी /कर्मचारी यांची यादी प्राधिकृत करुन खालील रकान्यात भरुन विभागीय आयुक्त स्तरावरुन उपआयुक्त (रोहयो) यांनी दि. ०२ मे, २०१५ पर्यंत जलसंधारण विभागास wcdjal1@gmail.com व dadarao.gaikwad@nic.in वर पाठवावे.**

| अ.क्र. | अधिका-याचे नाव | पदनाम | विभाग | भ्रमणध्वनी क्रमांक | आय.एम.ई.आय.क्रमांक (यासाठी IMEI क्रमांकासाठी *#06# डायल करावे.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

ई) प्रत्यक्ष Mobile Application द्वारे फोटो काढण्याची कार्यवाही दि. ०७ मे, २०१५ पासून सुरु करावी.

उ) दि.०६ मे,२०१५ पर्यंत पूर्ण झालेल्या कामांचे फोटो दि. १५ मे, २०१५ पर्यंत घेऊन या Mobile Application द्वारे अपलोड करणे बंधनकारक राहील.